कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज

राज्यशास्त्र विभाग

# महाराष्ट्र विधानसभा अभ्यास भेट

## गुरुवार दिनांक 20 फेब्रुवारी 2023

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र विधानमंडळ म्हणजे महाराष्ट्र विधानसभा, विधान परिषद व सचिवालय मुंबई येथे अभ्यासभेट गुरुवार दिनांक 20 फेब्रुवारी 2023 रोजी आयोजित केली होती

या अभ्यास भेटीसाठी प्रा.डॉ. एस के खडसे तसेच प्रा. डॉ अंगद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 14 विद्यार्थी विद्यार्थिनी यांची विधानसभा व  विधान परिषद सचिवालय आणि राजभवन मुंबई येथे अभ्यास भेट आयोजित करण्यात आली. अभ्यास भेटीमध्ये विधानसभा सभागृह, विधानसभा सभागृहाची रचना, त्यांची कार्यपद्धती, विविध समित्यांचे कामकाज, संसदीय कामकाज, विधेयक निर्मिती तसेच कायदा निर्मितीची प्रक्रिया याविषयी माहिती विधीमंडळातील प्रमुख माहिती अधिकारी मा. बाबा वाघमारे यांनी दिली.

विधानसभेतील कक्ष अधिकारी व उपसचिव यांच्या मार्गदर्शनाखाली विधान परिषद सभागृहाची माहिती सविस्तर दिली यामध्ये विधानसभेमध्ये विविध प्रकारे सदस्यांची कशी निवड केली जाते. राज्यसभा नियुक्त 12 सदस्य कसे निवडले जातात आणि सभापती कशा पद्धतीने कामकाज पाहतात तसेच सभागृहातील गॅलरी, सदस्य बैठक व्यवस्था सभापतीचे आसन, सभापतीचे अधिकार इत्यादी विविध स्वरूपाची माहिती त्यांनी दिली.



यानंतर माननीय बाबू वाघमारे विधानसभेतील जनसंपर्क अधिकारी निलेश मदने व इतर कक्ष अधिकारी उपसचिव यांच्यासह सेंटर हॉल म्हणजे मध्यवर्ती सभागृहात सर्व विद्यार्थ्यांना घेऊन गेले आणि मध्यवर्ती सभागृहाविषयी संपूर्ण माहिती या ठिकाणी दिली.

आमदारांच्या शपथविधी व्  मंत्र्यांच्या शपथविधी कशा पद्धतीने येथे राज्यपाल देतात. संसदीय संयुक्त अधिवेशन कशा पद्धतीने घेतले जाते याविषयी माहिती दिली आणि त्यानंतर विधानसभेचे मुख्य ग्रंथालय या ठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यास भेटीसाठी देण्यात आली. विधिमंडळाच्या ग्रंथालयात गेल्यानंतर विधिमंडळातील विविध स्वरूपाचे डॉक्युमेंट अर्थसंकल्प, विधेयक तसेच विविध संसदीय समित्यांचे अहवाल, भारतीय राज्यघटना आणि संपूर्ण देश राज्यातील वर्तमानपत्र सेक्शन इत्यादी विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना नेऊन दाखवण्यात आले तसेच आमदार व मंत्री यांना संसदीय कामकाज माहिती व आपल्या खात्यासंबंधीचे विशेष माहिती घेण्यासाठी ग्रंथालयांमध्ये विशेष संदर्भ कक्ष आहे ते दाखविण्यात आले.

यानंतर  सर्व विद्यार्थ्यांना विधानसभा कॅन्टीनमध्ये सर्व विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले.



या विधानसभा भेटीनंतर विधिमंडळाचे जनसंपर्क अधिकारी व माहिती अधिकारी माननीय वाघमारे यांनी राज्यपाल भवन येथे संपर्क करून विद्यार्थ्यांना संपूर्ण राजभवन दाखवण्यात आले. यावेळी दोन दिवस अगोदर माननीय राज्यपाल रमेश बैस यांचा शपथविधी पार पडला होता. यावेळी शपथविधीचा दरबार हॉल, राज्यपालाचे निवासस्थान, राज्यपालाचे कार्यालय तसेच विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना घेऊन विविध स्वरूपाची माहिती दिली. अतिशय अभ्यासपूर्ण असे महाराष्ट्र विधिमंडळसचिवालय, विधानसभा, विधान परिषद सभागृह आणि राजभवन येथे विद्यार्थ्यांची अभ्यास भेट यशस्वी झाली.